


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : २९३ वा बुधवार दि. २२ जानेवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# नाठाळाच्या माथी हाणू काठी...!

# भ्रष्ट मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे याचे निलंबन न होऊ देण्यामागे कुणाचा हात?

## सोन्याचे अंडे देणारा ठरतोय महसूल विभाग....!

**जनसंचलन/ बुलढाणा**

वरिष्ठांच्या दुर्लक्षितपणामुळे बुलढाणा हा भ्रष्टाचारी अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सोन्याचे अंडे देणारा ठरतोय. महत्वाच्या महसूल विभागात बदनाम व लाचल-चपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईपासून अलिप्त असलेला बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे संघटनेचे मोठे पद घेऊन मोठ्या रुबाबात शासकीय सेवा बजावत असतांना मलिदा लाटण्याचा आपला उपक्रम बिनधास्तपणे,कोणताही बोभाटा न करता निरंतरपणे राबवित आहे. जमिनीचे अनोंदणीकृत प्रमाणपत्र वाटणाऱ्या मेहकरच्या तत्कालीन मंडळ अधिकाऱ्याला जिल्हाधिकारी कार्यालयाने निलंबित केले होते.मात्र ह्या बहुचर्चित विजय टेकाळे नावाच्या भ्रष्ट मंडळ अधिकाऱ्याने असे कैक गैर कारभार केले असूनही आणि त्याच्या विरुद्ध दोन वर्षापासून तक्रारी असून सुद्धा तो उजळ माथ्याने फिरतोय कसा? हा प्रश्न निर्माण झाला आहे. भ्रष्टाचाराच्या बाबतीत अव्वल असलेला महसूल विभाग जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने म्हणा वा सहकार्याने कुण्या सोम्या गोम्याची, राजकीय नेते मंडळी, आमदार,खासदार व एसीबीच्या कारवाईची भीती न बाळगता डंके की चोटपर या भ्रष्टाचारी विजय दत्तात्रय टेकाळे या बहुचर्चित मंडळ अधिकाऱ्याचे पैसे कमावण्याचे उद्योग सुरू आहेत. कुणी याच्या या उद्योगात मध्येच उभा राहिल्यास त्याला आडवाड करण्याचे कसब त्याला चांगलेच अवगत झाले आहे.अर्थात त्याच्या या उपक्रमाला वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अर्थपूर्ण समर्थन व संमती आहेच,हे वेगळे सांगण्याची गरज नाही.विषय असा आहे की,बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे याने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक नियम) भंग केला असून,त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी वारंवार करण्यात आली. मात्र उपविभागीय अधिकारी यांनी बुलढाणा तहसीलदार व नायब तहसीलदार (महसूल) त्यांची संयुक्त समिती गठीत करण्यात आली असल्याचे कळविले होते.परंतु याला दीड वर्षाचा कालावधी लोटला अध्यापही चौकशी झालेली नाही. चौकशी होत नसल्याने आता तक्रारदार यांची थेट जिल्हाधिकारी यांचे विरुद्ध उच्च न्यायालयात जाण्याची तयारी आहे.भ्रष्ट मंडळाधिकारी विजय टेकाळे यांनी केलेली बोगस फेरफार नोंदणी संदर्भात तक्रारदाराने मागितलेली माहिती अप्राप्त असल्यामुळे उपजिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. दरम्यान मेहकर येथील तत्कालीन मंडळ अधिकारी यांनी अनोंदणीकृत प्रमाणपत्र वाटले असता त्यांना चौकशी करून त्वरित निलंबित करण्यात आले होते.परंतु टेकाळेंना का मोकाट सोडण्यात देण्यात येत आहे? असा प्रश्न निर्माण झाला आहे. बहुचर्चित मंडळ अधिकारी यांच्या सुरू




असलेल्या कार्यात नियमबाह्य न होणारी डोंगरखंडाळा,येळगावसह इतर ठिकाणी केलेल्या करोडो रुपयांच्या जमिनीं, प्लॉटची ब्रोकर व धनदांडग्याच्या मर्जीने स्वतःच्या फायद्यासाठी ग्रामपंचायत व चावडीतल्याना हाताशी धरून कोंप्रमाईस() करून केलेल्या नियमात न बसणाऱ्या सर्व कामाचा उलगडा पुढील प्रत्येक सत्रात

**हम अंदर की खबर रखते है...**

# सौंदर्य प्रसाधन दुकानात महिलेसोबत केली असभ्य वर्तणूक दुकानदाराला बदडले!

**जनसंचलन/खामगाव**

सौदर्य प्रसाधानाच्या खरेदीसाठी आलेल्या एका युवतीशी असभ्य वर्तणूक करणे दुकान मालकाच्या चांगलेच अंगलट आले. असभ्य वर्तन सहन न झाल्याने एका युवतीने भावासह दुकानात दाखल होत दुकान मालकाला बदडल्याची घटना दि. १७ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी पोलिसात तक्रार मात्र दाखल झाली नाही. खामगाव शहरालगतच्या एका वस्तीतील युवती बाजारातील एका दुकानात सौंदर्य प्रसाधन खरेदी करण्यासाठी गेली होती. त्यावेळी दुकान मालकाने युवतीची छेडा मालकाने तिच्याशी असभ्य वर्तणूक केली. काही साहित्य खरेदी करून बिल दिल्यानंतर देखील दुकान मालकाने असभ्य वागणूक दिली. घटनेनंतर युवती घरी परतली आणि घडलेल्या प्रकाराबाबत तिने आपल्या भावाला माहिती दिली. त्यानंतर तिचा भाऊ व ती पुन्हा दुकानात आले. त्यानंतरही दुकान मालकाने असभ्य वागणुकीची पुनरावृत्ती केली. यावर संतापलेल्या युवतीच्या भावाने दुकान मालकाला चोप दिला. त्यानंतर परिसरातील नागरिकांनी मध्यस्थी केली. अद्यापर्यंत पोलिसात तक्रार दाखल झाली नव्हती.



# अमृत भारत योजना अंतर्गत मलकापूर रेल्वे स्थानकाच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा..

**जनसंचलन/मलकापुर**



आज भुसावळ येथील डीआरएम सुनिल कुमार सुमन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या सविस्तर चर्चेत, मलकापूर स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी सरकता जिना (एस्केलेटर) बसवण्याची मागणी करण्यात आली. या चर्चेत अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, ज्यामुळे या प्रकल्पाला गती मिळण्याची आशा आहे. आमदार चैनुसूख संचेती यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीत प्रवाशांच्या सुविधा वाढवण्यासाठी आणि स्थानकाचा दर्जा उंचावण्यासाठी महत्वपूर्ण मुद्दे मांडण्यात आले. प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा पुरवण्यासाठी प्रशासन आणि स्थानिक संघटनांची एकत्रित मेहनत निश्चितच एक आदर्श निर्माण करेल. यावेळी जिल्हा प्रवासी संघाचे अध्यक्ष श्री. महेंद्र बुरड उपस्थित होते.

# संविधान हे लोकशाही बळकटीचे मूळमंत्र - चंद्रकांत खरात सामाजिक कार्यकर्ते

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**



देशात लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी संविधान गरजेचेअसून लोकशाहीच्या बळकटीसाठी संविधान हे मूळमंत्र असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी केले. या पार्श्वभूमीवर त्यांच्या मार्फत शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना येत्या २७ जानेवारी रोजी संविधान आणि उपदेशिका वितरण करण्यात येणार आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात हे गेल्या काही वर्षांपासून सामजिक बांधिलकी जोपासण्यासाठी व संविधानाविषयी लोकांमध्ये जागृतचा निर्माण करण्याच्या उद्देशाने भारताचे संविधान ग्रंथ व उद्देशिका वितरण समारोह आयोजीत करत असतात. यात अनेक शाळेतील आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून भारताचे संविधान ग्रंथ व उद्देशिका वितरण करण्यात येते. याहीवर्षी २७ जानेवारी रोजी स्थानिक श्री. व्यंकटेश महाविद्यालय येथे संविधान वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या साठी चंद्रकांत खरात यांनी गट शिक्षण अधिकारी पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांना पत्र पाठवून देऊळगाव राजा तालुक्यातील विविध शाळांमधील एक शिक्षक प्रतिनिधी तसेच १० विद्यार्थी पाठवून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. चंद्रकांत खरात यांच्या उपक्रमाचे कौतुक सर्वच स्तरातून होत आहे.

# होय खरं हाय!
# रविवारचा आठवडी बाजार भरणार नाय!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस कवायत मैदान येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा दि. २६ जानेवारी २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी विविध शाळांची प्रभातफेरी व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच कार्यक्रमासाठी स्त्री, पुरुष व लहान मुलांचा जमाव असतो. रविवार (दि.२६ जानेवारी) हा आठवडी बाजाराचा दिवस असल्याने बुलढाणा शहराच्या मुख्य मार्गावर, रस्त्यावर आठवडी बाजार भरत असतो. त्यामुळे या ठिकाणी गर्दी निर्माण होऊन रहदारीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याअनुषंगाने बाजार आणि यात्रा कायदा १८६२ च्या कलम ५ अन्वये कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतुकीस अडचण निर्माण होणार नाही या दृष्टीकोणातून बुलढाणा शहरामध्ये रविवार दि. २६ जानेवारी रोजी भरविण्यात येणारा आठवडी बाजार रद्द करण्यात येत असून आठवडी बाजार पुढील दिवशी भरण्यात यावा, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

# भुमराळा - किनगाव जट्टू मार्गावर खड्यांचे साम्राज्य ग्रामस्थ शेतकरी विद्यार्थ्यांचे हाल सुरुच

## विद्यमान आमदारांकडून वाढल्या अपेक्षा

**जनसंचलन/ लोणार**



सिंदखेडराजा मतदार संघातील शेवटच्या टोकावर असलेल्या व लोणार तालुक्यातील भुमराळा ते किनगाव जटटू या मुख्य भागातील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे गेल्या तीन वर्षांपासून भुमराळा किनगाव जटटू मार्गावर खड्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे त्यामुळे ग्रामस्थांच्या नशिबी अजूनही भोग सुरुच आहे या मार्गावर ये जा करणारे वाहन चालक,शेतकरी, विद्यार्थी, अक्षरशा त्रस्त झाले आहे आज घडीला हा मार्ग विद्यार्थ्यांसाठी व वाहनधारकांसाठी जीवघेणा ठरत आहे भुमराळा येथुन हा मार्ग मुख्य मार्ग व जागतिक लोणार सरोवर ते संभाजीनगर मार्गाला जोडल्या गेला असुन या मार्गाने गावकरी, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थांची मोठी वर्दळ असते परंतु मार्गावर जागोजागी मोठ मोठे खड्डे पडले असून गिट्टी उघडली असल्याने मार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे रात्री खड्डे चुकवण्याच्या नादात वाहनधारकांचे अनेक अपघात होत आहेत वाहने चालवताना वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागते अशा दुरवस्था झालेल्या मार्गाकडे माजी लोकप्रतिनिधींनी सतत दुर्लक्ष केले असून विद्यमान लोकप्रतिनिधींकडुन वाहनधारकांच्या अपेक्षा वाढल्या असुन संबंधित विभागातील अधिकारी व लोकप्रतिनिधी भुमराळा ते किनगाव जटटू रस्त्याच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे शासनाने निधीची तरतूद करून डांबरीकरणाचे काम पूर्ण करून द्यावे अशी मागणी वाहनधारक, विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूरांकडून होत आहे भुमराळा गावानजीक एक किलोमीटर पर्यंत घाट रस्ता असुन त्या घाटातील डांबरीकरण पुर्णपणे उखडून गेले आहे त्यामुळे अनेक मालवाहू गाड्या, मोटारसायकल, एसटी बस, रुग्णवाहिका सह सर्वच वाहनधारकांना या घाटातून वाहने चालवितांना तारेवरची कसरत करावी लागते आहे अनेक वेळा या घाटात अपघात सुद्धा झाले असून याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे देऊळगाव राजा येथील इंजिनिअर यांना याबाबत माहिती दिली असून मतदार संघाचे आमदार मनोज कायंदे यांना भेटून सर्व समस्या मांडणार असुन आमदार आमच्या समस्या सोडवतील असा विश्वास भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांनी व्यक्त केला

# सुपर अबॅकस स्पर्धेत दक्ष सुपर अबॅकस चे सहा विद्यार्थी सन्मानित

**जनसंचलन/ रायपूर**




१९ जानेवारी२०२५ रोजी रविवारी ला छत्रपती संभाजी नगर येथे स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ६२८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला यावेळी सुपर अबॅकस चे संचालक मनीष महाजन सर आणि विदर्भ विभाग प्रमुख राजेश परदेशी सर यांनी आयोजित केलेल्या सुपर अबॅकसची नॅशनल विंटर चॅम्पियनशिप २०२५ ची स्पर्धा सकाळी घेण्यात आली या कॉम्पिटिशनमध्ये प्रमुख अतिथी सौ. अंजली धानोरकर मॅडम उपजिल्हाधिकारी आणि सुनील देसरडा प्रख्यात उद्योजक व समाजसेवक उपस्थित होते. रायपूर आणि बुलढाणा येथील दक्ष सुपर अबॅकस अकॅडमी मधुन सहा विद्यार्थी सहभाग घेऊन आपले स्थान अर्जित केलेले आहे. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत पारितोषिक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. दक्ष सुपर अबॅकस अकॅडमीचे संचालिका सौ. अमृता धीरज जयस्वाल यांना प्रमुख अतिथी सौ. अंजली धानोरकर उपजिल्हाधिकारी मॅडम यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार व उत्कृष्ट पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. पारितोषिक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना मध्ये मनस्वी राजकुमार जयस्वाल, आरोही अंकुश जयस्वाल, दक्ष धीरज जयस्वाल, नव्या आशिष जयस्वाल, अनन्या मनोज ठाकूर, सिया पवन जयस्वाल या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# देश आणि समाज सक्षम करण्यासाठी शिक्षणाची भुमिका महत्वाची - केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव



**जनसंचलन/बुलढाणा**

देश आणि समाज सक्षम करण्यासाठी शिक्षणाची भुमिका महत्वाचे असून शिक्षणाचे धडे देणाऱ्या शिक्षकांचेही कार्य महत्वपुर्ण आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. बेंगळुरू येथील श्री श्री रविशंकर विद्या मानववीर ट्रस्टने आयोजित केलेल्या ङ्कश्री श्री एज्युकेशन अवॉर्ड्स २०२५फ्फ चे केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले, त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रविशंकरजी उपस्थित होते. मंत्री श्री. जाधव म्हणाले की पुरस्कार हे शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करते. पुरस्कार प्राप्त व्यक्तींनी समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करावे, असे त्यांनी आवाहन केले. देश का प्रकृती अभियान देशात २६ नोव्हेंबर २०२४ ते २५ डिसेंबर २०२४ पर्यंत चांगल्यारितीने राबविल्या गेले. या अभियानात तंत्रज्ञानाचा वापर करून व्यक्तींना त्यांच्या प्रकृती संदर्भाची माहिती देण्याचं काम देशभर केल्या जात आहे. श्री श्री रविशंकर यांचा आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारने संपूर्ण देशभर लोकांमध्ये जनजागृती व सकारात्मकता आणण्यासाठी महत्वाची भूमिका बजावीत आहे. आर्ट ऑफ लिव्हिंग ही संस्था जागतिक दर्जाची आहे. तणावमुक्त आणि मूल्यावर आधारित शिक्षण देत असल्याबद्दल संस्थेचे कौतुक केले. शिक्षण हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा आधार असल्याचे सांगून विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि नैतिक विकासावर भर दिला पाहिजे, अस मत ही त्यांनी व्यक्त केले आणि पुरस्कार प्राप्त व्यक्तींचे अभिनंदन केले.

# दुचाकी अपघातात एक ठार...




**जनसंचलन/ डोणगाव**

दुचाकीचे ब्रेक लावल्याने रस्त्याच्या बाजूला असलेल्या मुरमाच्या ढिगावर पडून एकजण ठार झाल्याची घटना दि. १९ जानेवारी रोजी घडली. विनोद निवृत्ती देशमुख (वय ४५, रा. आंध्रुड) असे मृतकाचे नाव आहे. डोणगाव येथून जवळच असलेल्या आंध्रुड येथील विनोद निवृत्ती देशमुख हे १९ जानेवारी रोजी दुचाकीने शेतातून घरी जात होते. दरम्यान, सायंकाळी शेतातून परतताना अपघात गावाजवळ मेहकरकडून घाटबोरीला जात असलेल्या बसला त्यांनी ओव्हरटेक केले. समोरून येत असलेल्या दुचाकीला वाचविण्याच्या प्रयत्नात विनोद देशमुख यांनी त्यांच्या दुचाकीचे ब्रेक लावले. त्यामुळे ते रस्त्यावरील मुरमाच्या ढिगावर कोसळले. त्यात त्यांच्या डोक्याला मार लागला. त्यांना मेहकर येथे उपचारासाठी नेले असता, डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकरणी पुढील तपास डोणगाव पोलिस करीत आहेत.

## ओम मुंढे किकबॉक्सिंग स्पर्धेत राज्यात प्रथम बुलढाणा जिल्हा सह लोणार तालुक्याचे मान उंचावली




**जनसंचलन/ लोणार**

ओम गजानन मुंढे यांनी नुकत्याच सातारा येथे झालेल्या शालेय राज्यस्तरिय किकबॉक्सिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावुन जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवून जिल्हयाला एक वेगळी ओळख निर्माण करून दिली असून त्याच्या या यशाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे तालुक्यातील सरस्वती विद्यालय पांग्रा डोळे या विद्यालयाचा विद्यार्थी ओम गजानन मुंढे यांनी शिक्षणासोबतच एक आगळावेगळा छंद जोपासून ग्रामीण भागात आपली एक वेगळीच ओळख निर्माण केली आहे बुलढाणा येथे झालेल्या जिल्हास्तरीय व अमरावती येथे झालेल्या शालेय विभागीय किकबॉक्सिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून दिनांक १५ व १८ जानेवारी रोजी सातारा येथे झालेल्या १६,१७,१८ वयोगटात ५२ किलो वजन गटातून अमरावती विभागातून खेळत कोल्हापूर विभागाचा समर्थ दिवटे व मुंबई विभागाचा नितेश देवकाते या खेळाडूंचा पराभव करत महाराष्ट्र राज्यातून प्रथम क्रमांक पटकावला व आता ओमची शालेय राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वच क्षेत्रामधुन कौतुक केले जात आहे सोबतच ओमची बहिण निकिता मुंढे हिने सुध्दा पुण्यात खराडी येथे झालेल्या खेलो इंडियामध्ये गोल्ड व सिल्व्हर पदक पटकावले आहे ओमला रामप्रसाद सोनने सरांचे प्रशिक्षण लाभले आहे या नेत्र दीपक कामगिरीमुळे ओम मुंढे यांनी जिल्ह्यासह लोणार तालुक्याची मान उंचावली असून त्याचे पंचक्रोशीत सर्वत्र कौतुक होत आहे

# वर्षभरापूर्वी चोरी गेलेले शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत तारा आठ दिवसांत ओढा अन्यथा कंपनी कार्यालयात ठेचा भाकर खाओ आंदोलनाचा भोजने यांचा इशारा



**जनसंचलन/मलकापुर**

शेतकऱ्यांच्या शेतातून एक वर्षापूर्वी चोरी गेलेले तार तात्काळ ओढा अन्यथा म.रा.वि.वि कंपनी कार्यकारी अभियंता कार्यालयात शेतकऱ्यांसह ठेचा भाकर खाओ आंदोलनाचा शिवसेना जिल्हाप्रमुख वसंतराव भोजने यांचा म.रा.वि.वि कंपनी कार्यकारी अभियंता आर. जि. तायडे यांना इशारा दिला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, नांदुरा तालुक्यातील ग्राम येरळी येथील पंडितराव जगन्नाथ पाटील यांच्यासह इतर शेतकऱ्यांच्या गट नंबर १४५ मधील शेतातील ११ पोलवरील विद्युत तार गेल्या एक वर्षांपूर्वी चोरीला गेले आहेत, ग्राम आमसरी येथील भगवान सुगदेव बावस्कर सुजातपूर गट नंबर ४४ यांच्यासह ९ पोलवरील तार ६ महिन्यांपूर्वी चोरी गेले आहेत, समाधान बळीराम जामोदे निमगांव गट नंबर ६०८ यांच्या शेतापासुन संतोष देशमुख यांच्या शेतापर्यंत इतर शेतकऱ्यांच्या शेतातून १२ पोलवरील विद्युत तार ,काळे डि. पी पर्यंत चे ४ पोलवरील विद्युत तार गेलेले वर्षापासून चोरी गेले आहेत तसेच प्रशांत सुधाकर बाणाईत, मंगेश नायसे रा.कोळंबा, गट नंबर १०५ यांच्या शेतातील १६ पोलवरील विद्युत तार एक वर्षापासून चोरी गेले आहे उपरोक्त शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरीत पाणी असतानाही पिकांना पाणी देऊ शकत नसल्याने त्यांच्या शेती उत्पन्नात प्रचंड घट होवून त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयावर उपासमारीची वेळ आली आहे म.रा.वि वि कंपनीकडे लेखी,तोंडी तक्रारी करून सुद्धा तार ओढत नसल्याने संबंधित शेतकऱ्यांनी आज याबाबतची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख वसंतराव भोजने यांना देताच त्यांनी शेतकऱ्यांसह मलकापूर येथील कार्यकारी अभियंता आर. जि.तायडे यांचे कार्यालय गाठले आठ दिवसात संबंधित शेतकऱ्यांना तार ओढून न दिल्यास म.रा.वि.वि कंपनी कार्यालयातच शेतकऱ्यांसह ठेचा भाकर खाओ आंदोलनाचा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख वसंतराव भोजने यांनी दिला, यावेळी त्यांचे सोबत मलकापूर शिवसेना शहरप्रमुख गजानन ठोसर,पंडीतराव पाटील,संजय जामोदे सह शेतकरी उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मानसात देव समजनारे डॉ. सुभाष जोशी व डॉ.दत्ता भराड यांना डॉ.खासबागे मानव सेवा पुरस्काराने सन्मानित

जनसंचलन/बुलडाणा

बुलडाणा येथील स्वर्गीय डॉ.अरुण खासबागे मानव सेवा पुरस्कार गेल्या दहा वर्षा पासून त्यांची मुले प्रेम आणि आशिष चालवत आहे. महाराष्ट्रातील वैद्यकीय क्षेत्रात जे सेवाभावी सेवा देतात त्यांच्या कार्याचा सन्मान व्हावा म्हणून गेली दहा वर्षांपासून हा उपक्रम चालू आहे. तोच उपक्रम ठेवून या वर्षीचा पुरस्कारचे २०२५ चा वितरण सोहळा स्थानिक बुलडाणा येथील द्वारका हॉटेल सभागृहामध्ये डॉ. अरुण खासबागे स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा डॉ.खासबागे मानव सेवा पुरस्कार यावर्षीचा ज्याच्या पोटात नाही त्याच्या पोटात घाला उपासनी पोटी कोणीही जाता कामा नाही असे सांगणारी त्यांची सहचारिणी त्या शब्दांचे अनुकरण करणारे गोरगरीबांना वैद्यकीय सेवा देणारे गरिबी काय असते हे जवळून पाहणारे गरिबीचे चटके कसे असतात हे माहीत असल्यामुळे त्यांची जाणीव ठेऊन प्रत्यक्ष कृतीत आणनारे ज्यांचे जवळ पैसे असो नसो भाड्याला पैसे देऊन कित्येक गोरगरीबांना निस्वार्थी सेवा देणारे मराठवाड्यातील ग्राम वालसावगीचे मुळ निवासी असलेले बुलडाणाचे सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ तीन दशकाहून अधिक वैद्यकीय सेवा देणारे रूग्ण सेवा हीच ईश्वर सेवा माननारे डॉ.सुभाष मुरलीधर जोशी व एक कंपाडरचा एक डॉक्टर होतो हे दाखवून देणारे जिद्द चिकाटी संघर्षच्या जोरावर डॉक्टर होऊन गोरगरीबांना वैद्यकीय सेवा देणारे जेव्हढे असेल तेव्हढे द्या नसेल तर जाऊद्या असी सेवाभावी वैद्यकीय सेवा देणारे दानसूर त्यांचा जीवन पट ऐकला की, मन हेलावून जाते असे चिखली येथील डॉ.दत्ता गणपत भराड यांना इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.अजित शिरसाट,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.भागवत भुसारी, संजयजी बोथरा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये त्यांच्या कार्याचा शाल पुष्पगुच्छ सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार प्रदान करण्यात आला व त्यांच्या पुढील भावी वाटचालीसाठी दिर्घ आयुष्य साठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी डॉ.शिवानी बोथरा या उत्कृष्ट गुणांनी एमडी रेडिओलॉजी उत्तीर्ण झाल्या म्हणून डॉ.अजित शिरसाठ यांच्या हस्ते त्यांना शाल स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पुरस्कार वितरणाचा उद्देश व पुरस्कार वितरणाचे निकष डॉ. आशिष खासबागे यांनी विषय केले आपल्या मनोगतातून डॉक्टर परिहार यांनी डॉ. जोशी व डॉ.दत्ता भराड यांच्या वैद्यकीय सेवेचा व सामाजिक बांधिलकीचा उपस्थितांना परिचय करून दिला तसेच डॉ. बोथरा यांनी वैद्यकीय सेवेची आव्हान याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले तसेच डॉ.भागवत भुसारी यांनी सत्कारमूर्तींना शुभेच्छा दिल्या याप्रसंगी एमडीओलॉजी उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल डॉ. शिवानी बोथरा यांचा देखील सत्कार करण्यात आला आपल्या सत्काराला उत्तर देताना डॉ.भराड यांनी मला माझ्या गुरुच्या नावाने पुरस्कार मिळाला ही पुंजी मला आयुष्यभर प्रेरणा देत राहील असे भावनिक उदगार काढले तसेच डॉ.जोशी यांनी हा माझा सत्कार नसून माझ्या प्रत्येक रुग्णाचा सत्कार असल्याचे नमूद केले आपल्या अध्यक्ष भाषणात डॉ. शिरसाठ यांनी डॉक्टर खासबागे यांनी आम्हाला वैद्यकीय सेवेचा मूलमंत्र दिला तो आम्हास प्रेरणादायी राहील या माध्यमातून उपस्थितांची मने जिंकली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपंग निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक कवी रमेश आराख यांनी केले



तर आभार प्रदर्शन प्राध्यापक प्रेम खासबागे यांनी केले सदर कार्यक्रमाला डॉ.उकार्डे,डॉ.भागवत, डॉ.पुंडकर,डॉ. स्वप्नील भराड,डॉ.परीहार,डॉ.शिवानी बोथरा,डॉ.सुनिता बोथरा,दैनिक सम्राट,दै.सामपत्र चे जिल्हा प्रतिनिधी बाबासाहेब जाधव,दैनिक पुण्यनगरी चे प्रतिनिधी हर्षानंदन वाघ,आर्यन खासबाग, डॉ.वर्षा खासबागे,सुचेता खासबागे,कबीर खासबागे,मुरलीधर भोपळे,पीएसआय पाटील ,अविनाश काळे, डॉ.कुलकर्णी ,विकी चव्हाण, चंद्रशेखर जोशी,डॉ.श्रीराम जोशी,गजानन शिरसागर,डॉ. कोथळकर या पुरस्कार वितरण सोहळ्याला शहरातील व शहराबाहेरील शिक्षण,वैद्यकीय,पत्रकारिता विधीक्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

# त्रिशरण चौकात लागली आग!



जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा चिखली मार्गावरील त्रिशरण चौकात एका टपरीला आग लागल्याने खळबळ उडालीय. दरम्यान अग्निशामक दल वेळेवर पोहचल्याने ही आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. चिखली मार्गावरील त्रिशरण चौक नेहमी गजबजलेला असतो.येथे अनेक अतिक्रमित टपऱ्या आहेत.आत्ता थोड्या वेळापूर्वी एका टपरीला अचानक आग लागल्याने खळबळ उडाली.बघायची मोठी गर्दी जमली होती.दरम्यान अग्निशामक दल तातडीने पोचल्यामुळे लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# श्री.पाई विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न...

जनसंचलन/जलंब

येथील श्री पाई विद्यालयात सन १९९८-९९ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये मैत्रि सोहळा ,स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी गडचिरोली, मुंबई,नागपुर पुणे नाशिक जळगाव इत्यादी ठिकाणावरून जवळपास १५० माजी विद्यार्थी परिवारासह उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी शालेय जिवनातिल जुन्या आठवणींना उजाळा देऊन एकमेकांची आस्थेने चौकशी केली, सदरच्या कार्यक्रमात श्री पाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार राठी यांनी स्नेहसंमेलनाचे अध्यक्षस्थानी होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पाई हायस्कूल चे प्राचार्य काळे सर,पयसोडे सर,खर्चे सर,सोनटक्के सर,देशमुखसर,देवचेसर,नाफडे सर,खर्चे सर, घोपे सर,दात्तिरसर रोकडेसर,खुमकर मॅडम, निंबोळकर सर निवाणेसर,राणेसर,अभिषेक जामोदे सर श्रीकृष्ण असंबे सर व शिक्षकेतर कर्मचारी बंडु भारती व मोरे भाऊ यांचा माजी विद्यार्थ्यांकडुन स्नेहपुर्ण सत्कार करण्यात आला.शिक्षकांनी सत्काराला उत्तरे देत असतांना विविध विषयांवर मार्गदर्शन करून भावि जीवनात यश संपादनासोबतच भावि पिढी साक्षर व सुसंस्कृत कशी घडेल यावर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले व सर्वाचे कौतुक केले. शाळा भरण्याची सुरूवात जशी होते तशी शाळेची घंटि वाजवून एक दिवसाची शाळा भरवण्यात आलि त्यानंतर राष्ट्रगीत म्हणून कार्यक्रमाची सुरूवात केली.नंतर दीपप्रज्वलन व मा सरस्वती मातेची पुजा केली त्यानंतर आलेल्या मान्यवरांचा सत्कार आणी त्यांचे मनोगत व्यक्त करण्यात आले. पहिल्या सत्राच्या शेवटी स्नेह भोजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर दुपारच्या सत्रात गित गायनाचा कार्यक्रम दत्ता जवळकार आणि श्रीकृष्ण नालट यांनी तर हास्य विनोदी कार्यक्रम व परिचय आणि फिस फाण्डचा कार्यक्रमाचे सादरीकरण सतिश खुरद यांनी केले, फिस फाण्डचा बहारदार कार्यक्रम झाला

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958